IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380

ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-51

## Special Issue of Department of History, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

5th June 2021





# RECENT TRENDS IN MODERN HISTORY







**Chief Editor**

**Dr. Subodh Kumar Singh**

Principal

**Editor**

**Dr. Dipak P. Lonkar**

Head, Dept. of History

Book 2

| | | |
|---|---|---|
| 67 | अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ<br>*डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे* | 323-325 |
| 68 | राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे, राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार<br>*प्रा.डॉ.भारत वि.नखाते* | 326-329 |
| 69 | क्रांतिकारक : वीर बाबुराव शेडमाके<br>*प्रा. डॉ. डी. एल. कामडी* | 330-333 |
| 70 | वंचितांचा इतिहास<br>*डॉ. कल्पना एन. सांगोळे* | 334-338 |
| 71 | शस्त्रशास्त्र : इतिहास घडवणाऱ्या शस्त्रांच्या इतिहासलेखनाचे शास्त्र<br>*श्री. मृन्मय दीपक अरबुने* | 339-341 |
| 72 | स्वयंभू श्री. हरिश्चंद्र महादेव मंदिराचा इतिहास<br>*प्र. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ* | 342-345 |
| 73 | स्थानिक इतिहास आणि त्यामधील प्रमुख घटक<br>*प्र. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील* | 346-348 |
| 74 | ब्रिटिश कालीन चंद्रपूर नगरपालिकेतील सार्वजनिक शिक्षण सुधारणा<br>*प्र. डॉ. प्रमोद ना. घ्यार* | 349-351 |
| 75 | चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य एक मागोवा<br>*प्र. सचिन पुंडलिक नन्नावरे* | 352-356 |
| 76 | वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक क्रांती<br>*डॉ. राजेंद्र पी. डवले* | 357-362 |
| 77 | कालेगाव येथील प्राचीन शिव मंदिर एक अभ्यास<br>*डॉ. रवीकिरण जाधव & श्री. ज्ञानेश्वर सतिश इरकर* | 363-368 |
| 78 | सबाल्टर्न लेखनप्रवाह आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत चंद्रपूर जिल्ह्यातील वंचीतांचे योगदान<br>*डॉ. पुरुषोत्तम माहोरे* | 369-373 |
| 79 | विसाव्या शतकातील भारतीय मुस्लीम स्त्रियांची स्थिती<br>*कु. [illegible]* | 374-378 |
| 80 | भारतातील स्त्रीयांच्या उन्नतीची चळवळ<br>*प्रा. कावळे शिवाजी ईरबा* | 379-383 |
| 81 | बांग्लादेश संदर्भात इंदिरा गांधी यांचे कर्तृत्व<br>*प्रा. शिवचरण पांडे* | 384-386 |
| 82 | सातपुडा पर्वतरांगातील आदिवासींचे सण-उत्सव<br>*प्रा. डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी* | 387-392 |
| 83 | स्त्रीवाद<br>*डॉ. [illegible]* | 393-398 |
| 84 | भद्रावती येथील भद्रनाग मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास<br>*डॉ. प्रा. जयवंत नथ्थुजी काकडे* | 399-404 |
| 85 | १९४२ चे चलेजाव आंदोलन आणि चंद्रपूर जिल्हा<br>*प्रा. राजेंद्र एम. देवाळकर* | 405-407 |
| 86 | म. गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांची ग्रामोदयाची संकल्पना<br>*प्रा. डॉ. शरद बेलोरकर* | 408-409 |
| 87 | प्रादेशिक इतिहास<br>*प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर* | 410-414 |
| 88 | कर्जतचे ग्रामदैवत गोदड महाराज रथ यात्रा:—एक सांस्कृतिक वारसा<br>*प्रा.डॉ. चौधरी डी.एन* | 415-417 |
| 89 | चंद्रपूर जिल्ह्यातील गोंड राजे<br>*प्रा. नरेंद्र विश्वनाथ झाडे* | 418-422 |
| 90 | महात्मा फुले यांनी प्राचीन भारतातील वर्ण आणि जाती व्यवस्थेची केलेली ऐतिहासिक चिकित्सा<br>*डॉ. शहाजी कांबळे* | 423-431 |
| 91 | महात्मा फुले यांना अभिप्रेत 'सुराज्य'<br>*प्रा. अरविंद म. पुनवटकर* | 432-434 |
| 92 | बडोद्यातील अजोड वस्तुसंग्रहालय<br>*प्रा. पंकजा कमलेश अहिरे & डॉ. जे. को. पेलोडे* | 435-441 |
| 93 | विदर्भातील प्रसिद्ध प्राचीन भद्रावती नगरीचे ऐतिहासिक अध्ययन (इ. स. पू. ६ दे शतक ते १२ दे शतक)<br>*प्रा. संघपाल तुकाराम जुलमे* | 442-448 |
| 94 | प्राचीन भारतातील नगरांचा विकास : एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर* | 449-452 |
| 95 | कंपनी सरकार कालीन भूमी व्यवस्था - एक अध्ययन<br>*डॉ सचिन पत्रुजी भोगेकर* | 453-456 |
| 96 | आगळगाव, इरळी येथील सुरसुंदरी शिल्पे<br>*प्रा. डॉ. सौ. माया ज. पाटील & श्री. सचिन पांडुरंग शिंदे* | 457-461 |
| 97 | गोंडकालीन राज्यकर्ती — राणी दुर्गावती<br>*प्रा. लक्ष्मण रघुप्रसाद मोरे* | 462-466 |
| 98 | मराठवाड्याची खाद्यसंस्कृती<br>*प्र. डॉ. सुनिता हनुमंतराव शिंदे* | 467-468 |
| 99 | जनवादी इतिहासलेखन<br>*प्रा. डॉ. संदिप मारोती महाजन* | 469-474 |
| 100 | "भारत छोडो आंदोलन" : चिमूर स्वातंत्र्यलढा<br>*प्रा. विनोद राजेंद्र कामडी* | 475-477 |

# वऱ्हाडातील महानुभाव संप्रदाय: एक सामाजिक क्रांती

**डॉ. गजेन्द्र बी. ढवळे**

*इतिहास विभाग प्रमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती*

*Mobil No. 9423623324, gmail- gbdascc@gmail.com*

**प्रस्तावना :**

यादवांच्या राजवटीत स्वास्थ लाभल्यामुळे शुद्र म्हणून उपेक्षिलेला तसेच जनसामान्य समाजही बराचसा सुधारला होता. त्यांची आर्थिक स्थिती जशी सुधारली होती तशीच बौध्दिक व मानसिक स्थितीही सुधारली होती. पण संस्कृत येत नसल्यामुळे व त्रैवर्णिकांचे अधिकार नसल्यामुळे या प्रचंड लोकसमूहाच्या बुध्दीची व मनाची उपासमार चालली होती. शिवाय संस्कृत मध्ये चाललेले तात्विक वादविवाद कोणी पुराणिकाने त्यांच्या कानावर घतलेच तर त्यामुळे त्यांना समाधान वाटण्याऐवजी उलट त्यांच्या मनाचा गोंधळ उडून जाई. निरनिराळे उपासनापंथ आणि भिन्नभिन्न तत्वज्ञानाने आपलाच मार्ग वेदप्रतिपादित आहे असे सांगू लागली म्हणजे या भोळया परंतु श्रध्दाळू जनतेला त्यातला कोणता मार्ग पत्करावा याचा उलगडा करिता येईना. अशी धार्मिक गोंधड निर्माण झाला होता. अशातच ऐलिचपूर येथे राजा दरण्णा हा यादवांचा मांडलीक म्हणून राज्य करीत होता त्यावेळी त्यांना झाडीमंडळाच्या मोहीमेवर असताना या एका सत्पुरूषाची भेट झाली. व ऐलिचपूरच्या महालात घेऊन आले त्यांनी नंतर महानुभाव पंथाची स्थापना केली.

**महानुभाव पंथाचा विस्तार :—** अशा धार्मिक गोधंडाच्या परिस्थितीत हिंसारहित, संगरहित व प्रवृत्तिधर्म—कर्मरहित असा संन्यासमार्गाचा पुरस्कर्ता व भक्तिसांप्रदायी महानुभाव पंथ वऱ्हाडात उत्पन्न झाला.[१] श्रीचक्रधरांनी वऱ्हाडात स्थापण केलेला ऐक विशिष्ट संप्रदाय 'महानुभाव पंथ' या नावाने आजच्या महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. या निरनिराळया प्रांतात, चक्रधराचा हा संप्रदाय वेगवेगळया संज्ञानी संबोधिला जातो. महाराष्ट्र आणि वऱ्हाडात त्याला महानुभाव पंथ म्हणतात. बुंदेलखंडात तो अच्युतपंथ म्हणून प्रशिध्द आहे. तर पंजाबात व अफगाणिस्थानात त्याला जयकृष्णीपंथ असे नाव देण्यात येते. महानुभाव पंथ बाराव्या श्शतकाच्या शेवटी हा एक हिंदुधर्मान्तर्गत संप्रदाय होता. हा वैदिक की अवैदिक हा एक वादग्रस्त प्रश्न असून त्याची उलटसुलट चर्चा आजवर पुष्कळ झाली आहे.[२] तो विषय येथे घेणे योग्य होणार नाही. तो इमादशाही पूर्वकाळात वऱ्हाडात उदयाला आलेला होता तर इमादशाहीच्या काळानंतर त्याचा प्रसार व प्रचार काबूल—कंदाहारपर्यंत झालेला होता. हा पंथ वऱ्हाडातच नव्हे तर संपूर्ण भारतात महानुभाव पंथ या नावाने परिचित आहे. त्याला अनेक नावाने संबोधल्याचे दिसते. कित्येक ठिकाणी महात्मापंथ या नावानेही प्रशिध्द असल्याचे आढळून येते. अशा चार नावे आहेत. यात भटमार्ग आणि परमार्ग अशा दोन नावांची आणखी भर घातली पाहिजे, कारण, प्रस्तुत पंथाला उद्देशून या दान्ही नावांचा अनेक स्थळी उल्लेख आढळतो म्हणून महानुभाव या पंथाला एकूण साहा नावे आहेत. ती नावे अशी की, महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग, परमार्ग, महानुभाव या नावाने संप्रदाय ओळखल्या जातो.

महात्मा पंथ हे नाव पडण्याचे कारण असे, की चक्रधराचे अनुयायी एकमेकांना महात्मा या नावाने संबोधीत, व स्वत: चक्रधरही आपल्या शिष्यांना महात्मे म्हणत हे आपल्याला त्यांच्या ग्रंथातून दिसते ते असे, "महात्मेनि प्रियवक्तेया होआवें" यामुळे ज्या पंथात महात्मे आहेत तो महात्मा पंथ अशी कल्पना रूढ झाली असावी.[३] चक्रधराच्या